# प्रेसनोट

नाशिक,
दि. ०९/०५/२०२३

**आलोसे क्र १. आतिश अभिमान शेवाळे,कंत्राटी ग्रामसेवक,बोराळे ग्रामपंचायत,ता.चांदवड,जि.नाशिक आलोसे क्र २. बाकेराव भाऊसाहेब जाधव,सरपंच, बोराळे ग्रामपंचायत,ता.चांदवड,जि.नाशिक यांनी १५,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक** | नाशिक |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | कार्यवाही सुरु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | **आलोसे क्र १. आतिश अभिमान शेवाळे,कंत्राटी ग्रामसेवक,बोराळे ग्रामपंचायत,ता. चांदवड,जि.नाशिक आलोसे क्र २. बाकेराव भाऊसाहेब जाधव,सरपंच, बोराळे ग्रामपंचायत,ता.चांदवड,जि.नाशिक** |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | १५,०००/- रुपये |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | १५,०००/- रुपये |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांनी नोव्हेंबर २०२२ मध्ये बोराळे ग्रामपंचायतचे लोखंडी जिन्याचे केलेल्या कामाचे उर्वरित २००००/- रू त्यांचे किंवा मुलाचे खात्यावर जमा करण्याचे मोबदल्यात **आलोसे क्र २ बाकेराव भाऊसाहेब जाधव, सरपंच, बोराळे ग्रामपंचायत, ता. चांदवड, जि.नाशिक** यांनी फोनव्दारे तक्रारदार यांचे कडे प्रत्येकी १५,०००/- रू. लाचेची मागणी केली. व **आलोसे क्र १ आतिश अभिमान शेवाळे,कंत्राटी ग्रामसेवक,बोराळे ग्रामपंचायत,ता.चांदवड,जि.नाशिक** यांनी तक्रारदार यांचे कडे स्वत:साठी ७५००/- रू व आलोसे क्र २ यांचे साठी ७५००/- रू अशी एकुण १५०००/- रू लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान **आलोसे क्र १ आतिश अभिमान शेवाळे, कंत्राटी ग्रामसेवक,बोराळे ग्रामपंचायत, ता.चांदवड, जि.नाशिक** यांनी तक्रारदार यांचेकडुन १५,०००/- रू. लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि.०९.०५.२०२३ रोजी बोराळे ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले असुन त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंदविण्याची पुढील कार्यवाही सुरू आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :- ९९३०९९७७००

( नरेंद्र भा. पवार )
पोलीस उपअधीक्षक ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
नाशिक परिक्षेत्र, नाशिक